मा.विभागीय आयुक्त,पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय, (पुरवठा शाखा)
ई-मेल-punedcs@gmail.com दूरध्वनी-२६३६१८७७

---

जा.क्र.पुशा/कार्या/३/४१ /२०१७ पुणे, दि.१६ / १ /२०१७

**विषय:**-पुणे विभागातील पुरवठा निरिक्षक यांची दि.१/१/२०१७ रोजीची संयुक्त ज्येष्ठता सूची प्राथमिक स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत...

**ज्ञापन**

पुणे विभागातील जिल्हा आस्थापनेवरील पुरवठा निरिक्षक संवर्गातील कर्मचा-यांची संयुक्त ज्येष्ठता यादी शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०२०००/प्र.क्र.१२७/ई-९, दि.९/१०/२००० मधील सूचना विचारात घेऊन प्रसिध्द केली जाते.

शासनाचे महसूल व वनविभागाकडील परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.०२५/ई-७, दि.३१/१/२०१४ अन्वये पुरवठा निरिक्षक संवर्गातील ज्येष्ठता कशी निश्चित करावी याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली १९८२ मधील नियम ३ (क) व ४ (१) मध्ये केलेल्या तरतूदीनुसा ज्येष्ठता यादी सुधारित करणे आवश्यक असलेने त्याप्रमाणे ज्येष्ठता याद्या जिल्हा व विभागीय पातळीवर तयार करून प्रसिध्द करणेबाबतची कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत.

पुणे विभागातील पुरवठा आस्थापनेवरील पुरवठा निरिक्षक संवर्गातील कर्मचा-यांची पुरवठा निरिक्षक संवर्गातील सलग सेवा दिनांक विचारात घेऊन संयुक्त ज्येष्ठता यादी तयार करणेत आली असून सदरची यादी सोबत जोडली आहे.

पुणे विभागातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे/सोलापूर यांनी त्यांचे जिल्हयातील सर्व तालूक्यांच्या सूचना फलकावर ही ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत सर्व तहसिलदार यांना सूचना द्याव्यात. जिल्हयात कार्यरत असलेल्या पुरवठा निरिक्षक संवर्गातील सर्व कर्मचा-यांना यादी दाखवून सदरची यादी पाहिली असले बाबत प्रत्येक कर्मचा-यांची सही घेऊन सही घेतलेली प्रत या कार्यालयाकडे पाठविणेत यावी. सदरच्या यादीतील कोणत्याही बाबी संबंधात कर्मचा-यांची हरकत असलेस सदरची हरकत संबंधित कर्मचा-यांनी दि. १ / २ /२०१७ पर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे/सोलापूर कार्यालयाकडे सादर करावी. या हरकतींबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे/सोलापूर यांनी स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयाकडे दि. १ / २ /२०१७ पर्यंत अहवाल सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे/सोलापूर यांनीही यादीची तपासणी करुन काही दुरुस्ती असल्यास पुराव्याचे कागदपत्रासह इकडे कळवावे. ही यादी कार्यालयाचे संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत येत आहे.(WWW.divcompune.in)

उपआयुक्त(पुरवठा)
पुणे विभाग पुणे

**प्रत:**-सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी पुणे /सोलापूर

## प्रपत्र- अ

पुणे विभागातील पुरवठा आस्थापनेवरील पुरवठा निरिक्षक संवर्गाची दि.१/१/२०१६ रोजीची प्रारुप ज्येष्ठता सूची

पुरवठा निरिक्षक संवर्गात दि.१/१/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची अंतिम सेवा ज्येष्ठतासूची

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | नाव | जिल्हा | प्रवर्ग(नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असलेस त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/मर्यादित) विभागीय परिक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्तर क्रमांक व परिक्षेचे वर्ष | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | १ | श्री.ए.एस.कांबळे | पुणे | अ.जा. | २.६.१९७३ | १.३.२०१४ | पदोन्नती | १.३.२०१४ | ३०.६.२०३१ | S.S.C. | पुरवठा निरिक्षक संवर्गात दि.२८/२/२०१४ रोजी पदोन्नती |
| २ | २ | श्री.डी.एन.तावरे | पुणे | भ.ज.ब. | ९.६.१९७७ | १.३.२०१४ | पदोन्नती | १.३.२०१४ | ३०.६.२०३५ | T.Y.B.A. | |
| ३ | ३ | श्री.आर.आर.सप्तीसकर | पुणे | इ.मा.व. | ५.१२.१९८१ | ३.३.२०१४ | पदोन्नती | ३.३.२०१४ | ३१.१२.२०३९ | S.S.C. | |

उपआयुक्त (पुरवठा)
पुणे विभाग पुणे